


# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ६ । अंक २४ । मंगळवार १३ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322



श्री कालिका माता,अहिल्यानगर.
दुसरी माळ, वाहन- नंदी.
मूर्तिकार - श्री धनंजय वेळापूरे.
छाया - विशाल येंडे.

## पाथर्डीत सुऱ्याचा धाक दाखवून पैशांची बॅग लुटणारे चौघे जेरबंद

### एलसीबीची कारवाई, एक लाख ८० हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** पाथर्डी शहरात भरदिवसा ज्येष्ठ नागरिकावर शस्त्राने हल्ला करून पैशांची बॅग लुटणाऱ्या टोळीतील चार आरोपींना जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी १ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास क्रांती चौक येथील रहिवासी दीपक सुधाकर येळाई (वय ६२) हे प्लॉट विक्रीचे पैसे घेऊन जात असताना दोन दुचाकींवरून आलेल्या चौघांनी त्यांना अडवले. आरोपींनी येळाई यांच्या हातावर सुऱ्याने वार केले व कुकरीचा धाक दाखवून त्यांच्याकडील पैशांची बॅग जबरीने हिसकावून नेली. याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करण्यात आले. गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करत असताना मुख्य संशयित मुदस्सर उर्फ मुज्जू सादीक सय्यद (वय २२, रा. एडके कॉलनी, पाथर्डी) याला ताब्यात घेण्यात आले.

त्याच्याकडे कसून चौकशी केली असता त्याने इतर साथीदारांची नावे उघड केली. पोलिसांनी तत्काळ शोध घेत सुरज संतोष वडागळे, आकाश शरद हराळे (दोघे रा. सोनई, ता. नेवासा) आणि इसाक पापा शेख (रा. दुलेचांदगाव, ता. पाथर्डी) यांना ताब्यात घेतले.

मुदस्सर सय्यद याच्याकडून लुटलेल्या रकमेपैकी १ लाख ७० हजार रुपयांची रोख रक्कम आणि १० हजार रुपयांचा मोबाईल असा एकूण १ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. साहिल खान, राजू ठाकूर आणि सोमनाथ काळोखे हे साथीदार अद्याप फरार असून पाथर्डी पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.







बुऱ्हाणनगर येथील श्री तुळजाभवानी देवी मंदिरात तिसरे माळेच्या यात्रेनिमित मंदिर परिसरात भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती (छाया- राजू खरपुडे, नगर)

## दुष्काळग्रस्त भागातील पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा सुरळीत पुरवठा

### वितरणासाठी प्रशासन सज्ज । अहिल्यानगर जिल्ह्यात ६९ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ; ऑक्टोबर-नोव्हेंबरसाठी २ लाख ७९ हजार २३७ क्विंटल अन्नधान्याच्या उचलीस मंजुरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** राज्यात जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत झालेली पर्जन्यमानातील तूट आणि त्यातून निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ वेळेत आणि विनाविलंब मिळावा, यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे अन्नधान्य उपलब्ध करून देणे, अन्नधान्य वितरणात पारदर्शकता राखणे आणि दुष्काळाच्या काळात नागरिकांना दिलासा देणे, यासाठी पुरवठा यंत्रणा कार्यरत असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती हेमा बडे यांनी सांगितले.



दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अन्नधान्याची उपलब्धता, साठवणूक, उचल आणि रास्तभाव दुकानांमार्फत वितरण या सर्व बाबींचे नियोजन करण्यात येत असून, जिल्ह्यातील एकही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहू नये, याची दक्षता घेण्यात येत आहे.

जिल्ह्यातील ६९ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ

अहिल्यानगर जिल्ह्यात एकूण ११ लाख २५ हजार ८७ अंत्योदय, केशरी व शुभ्र शिधापत्रिका आहेत. या शिधापत्रिकांशी संबंधित अंत्योदय व प्राधान्य कुटुंबांतील एकूण ६९ लाख १८ हजार ८८२ लाभार्थ्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अन्नधान्याचा लाभ दिला जातो. शासनाच्या नियमानुसार पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य उपलब्ध करून देण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

दुष्काळामुळे ग्रामीण भागातील नागरिकांसमोर विविध आव्हाने निर्माण होत असताना, सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून पात्र कुटुंबांना अन्नधान्याचा लाभ नियमितपणे मिळणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे वितरण प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, तसेच लाभार्थ्यांना अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी संबंधित यंत्रणेला दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

दोन महिन्यांसाठी २ लाख ७९ हजार २३७ क्विंटल अन्नधान्याच्या उचलीस मंजुरी

जिल्ह्यातील तालुकानिहाय शासकीय गोदामांची एकूण साठवण क्षमता ३६ हजार ६० मेट्रिक टन आहे. ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२६ या दोन महिन्यांसाठी आवश्यक असलेल्या २ लाख ७९ हजार २३७ क्विंटल अन्नधान्याच्या उचलीस मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी १ लाख ५१ हजार ७०९ क्विंटल अन्नधान्याची उचल पूर्ण झाली आहे.

उर्वरित अन्नधान्याची उचल निर्धारित वेळेत पूर्ण करून त्याचे रास्तभाव दुकानांमार्फत पात्र लाभार्थ्यांना नियोजनबद्ध वितरण करण्यावर भर देण्यात येत आहे. यासाठी उपलब्ध साठा, मंजूर नियतन आणि प्रत्यक्ष वितरण यांचा नियमित आढावा घेण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला देण्यात आल्या आहेत.

अन्नधान्य उपलब्धतेची स्थिती एका दृष्टिक्षेपात

११,२५,०८७ - जिल्ह्यातील एकूण अंत्योदय, केशरी व शुभ्र शिधापत्रिका६९,१८,८८२ -अंत्योदय व प्राधान्य कुटुंबांतील लाभार्थी३६,०६० मे.टन - शासकीय गोदामांची एकूण साठवण क्षमता२,७९,२३७ क्विंटल - ऑक्टोबर-नोव्हेंबरसाठी मंजूर अन्नधान्याची उचल१,५१,७०९ क्विंटल - आतापर्यंत पूर्ण झालेली अन्नधान्याची उचल

पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांची माहिती पोहोचविण्यावर भर

दुष्काळ निवारणासाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना, अन्नधान्य वितरणाची स्थिती आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत उपलब्ध सुविधांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम संबंधित पुरवठा निरीक्षण अधिकारी व पुरवठा निरीक्षक यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

■ पान ४ वर

## अहिल्यानगरच्या रेल्वे प्रश्नांसाठी खासदार नीलेश लंके आक्रमक

### प्रकल्पांच्या कालमर्यादेची मागणी । पुणे-अहिल्यानगर लोकल, नवीन रेल्वे मार्ग, बंद पॅसेंजर सेवा आणि प्रवासी सुविधांचे प्रश्न रेल्वे स्थायी समितीच्या बैठकीत उपस्थित

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** अहिल्यानगर जिल्ह्यातील रेल्वे विकासाला गती मिळावी, प्रवाशांच्या सुरक्षिततेसह मूलभूत सुविधांचा विस्तार व्हावा आणि रखडलेल्या प्रकल्पांना निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावे, अशी आग्रही मागणी खासदार नीलेश लंके यांनी रेल्वे स्थायी समितीच्या बैठकीत केली. अहिल्यानगर जिल्ह्यातील रेल्वे प्रवाशांचे प्रश्न, नवीन रेल्वे सेवा, उड्डाणपूल व भुयारी मार्ग, शेतमाल वाहतुकीसाठी कार्गो टर्मिनल आणि स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी अशा विविध विषयांकडे त्यांनी समितीचे लक्ष वेधले.

रेल्वे प्रशासनाने केवळ आश्वासने न देता प्रत्येक प्रकल्पाची सद्यस्थिती, कामाची प्रगती आणि पूर्णत्वाची निश्चित तारीख जाहीर करावी, अशी भूमिका खासदार लंके यांनी मांडली. जिल्ह्यातील रेल्वे विकासाच्या मागण्या कागदोपत्री न राहता त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

अहिल्यानगर तसेच दौंड-मनमाड रेल्वे मार्गावर प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी 'कवच' स्वयंचलित रेल्वे सुरक्षा प्रणाली, ऑटोमॅटिक ट्रेन प्रोटेक्शन, आरएफआयडी टॅग, ऑप्टिकल फायबर केबल, ऑटोमॅटिक ब्लॉक सिग्नलिंग आणि इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग यंत्रणा कार्यान्वित करण्याची मागणी त्यांनी केली. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून रेल्वे प्रवास अधिक सुरक्षित करण्याची आवश्यकता त्यांनी मांडली.



अहिल्यानगर रेल्वे स्थानक परिसरातील उपलब्ध रेल्वे जमिनीचा वापर करून गती शक्ती कार्गो टर्मिनल, शेतमाल लॉजिस्टिक हब आणि कंटेनर डेपो उभारण्याचा मुद्दाही खासदार लंके यांनी उपस्थित केला. कांदा, दूध, भाजीपाला आणि अन्य कृषी उत्पादनांच्या वाहतुकीसाठी या सुविधा उपयुक्त ठरू शकतात. त्यातून शेतकऱ्यांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध होण्यासह स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते. रेल्वे परिसरात किऑस्क आणि रिक्षा स्टँडसाठी जागा उपलब्ध करून स्थानिक तरुणांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी देण्याची मागणीही त्यांनी केली.

अहिल्यानगर-पुणे, छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर आणि कल्याण-मुरबाड या प्रस्तावित रेल्वे मार्गांच्या सविस्तर प्रकल्प अहवालासाठी (डीपीआर) निश्चित कालमर्यादा जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली. रेल्वे विकास निगम लिमिटेड (आरव्हीएनएल) आणि इरकॉन यांच्या कामांचे मूल्यमापन करावे, तसेच

■ पान ४ वर

## पशुसंवर्धन रिक्त पदांच्या नियुक्ती कराव्यात - आ. काशिनाथ दाते सर

### मंत्री ना. पंकजाताई मुंडेंना निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर-** पारनेर तालुक्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांचा गंभीर प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार काशिनाथ दाते सर यांनी राज्याच्या पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. या भेटीदरम्यान पारनेर तालुक्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांची वस्तुस्थिती मांडत ग्रामीण भागातील पशुधन आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी तातडीने पदभरती करण्याची आग्रही मागणी केली. या मागणीची गांभीर्याने दखल घेत ना. पंकजाताई मुंडे यांनी संबंधित रिक्त पदांवर लवकरात लवकर नियुक्त्या करण्याचे आश्वासन दिले.

पारनेर तालुक्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वपूर्ण आधार असलेल्या पशुपालन व्यवसायाला बळकटी देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाचे सक्षम मनुष्यबळ



पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे ही केवळ प्रशासकीय बाब नसून, ती ग्रामीण भागातील पशुपालकांच्या दैनंदिन गरजा, पशुधनाचे आरोग्य आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्याशी निगडित असल्याने रिक्त पदभरतीचा प्रश्न प्राधान्याने सोडविणे गरजेचे आहे. पारनेर तालुक्यातील पशुसंवर्धन विभागातील मनुष्यबळाचा प्रश्न शासनस्तरावर मांडला असून, मंत्र्यांनी दिलेल्या विश्वासामुळे पदभरतीच्या अपेक्षा उंचावल्या आहेत.
आ. काशिनाथ दाते सर (विधानसभा सदस्य)

रिक्त पदांबाबत आ. दाते सरांनी बोलण झालं होतं, रिक्त पदे लवकरच भरण्यात येतील, हा विश्वास दिलासादायक आहे. पदभरतीमुळे पशुपालकांना वेळेत व दर्जेदार पशुधन आरोग्य सेवा देणे शक्य होईल.
डॉ. नितीन गाडीलकर
तालुका पशुसंवर्धन अधिकारी, पारनेर (प्रभारी)

रिक्त पदे भरल्यामुळे पशुसंवर्धन विभागाचे कामकाज अधिक सक्षम होईल. यामुळे पशुपालकांना पशुवैद्यकीय सेवा व शासकीय योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे देता येईल. आ. दाते सरांचे सहकार्याने होत आहे.
डॉ. अरविंद रेपाळे
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (प्रभारी)

## माजी पंचायत समिती सदस्य नंदकिशोर वाघमारे यांचा मनसेत प्रवेश

### शेवगाव शहराध्यक्ष पदाची जबाबदारी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव-** माजी पंचायत समिती सदस्य नंदकिशोर वाघमारे यांनी आज जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत प्रवेश केला.

शेवगाव येथे झालेल्या बैठकीत वाघमारे यांची मनसे शहराध्यक्ष पदी नियुक्ती करत जबाबदारी सोपवण्यात आली यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे



म्हणाले की, वाघमारे हे माजी पंचायत समिती सदस्य असून त्यांना निवडणुकीचा अनुभव आहे जनमत त्यांच्या मागे आहे याचा फायदा शेवगाव शहरांमध्ये पक्ष संघटना वाढीसाठी निश्चित होईल तसेच आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या दृष्टीने आतापासूनच शहरांमध्ये जोमाने काम सुरू करावे

■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

# दत्त कॉलनीत देवीची वाजतगाजत भव्य मिरवणूक; नवरात्रोत्सवात विविध स्पर्धांचे आयोजन

अहिल्यानगर इ दातरंगे मळा येथील दत्त कॉलनीत




श्री सूर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठान ट्रस्ट आणि निलांबरी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्रोत्सव उत्साहात साजरा करण्यात येत आहे.

नवरात्रोत्सवानिमित्त सबजेल देवी चौक ते दातरंगे मळा अशी देवीची भव्य मिरवणूक वाजतगाजत काढण्यात आली. बँड पथक, सुमधुर देवीगीतांचा गजर आणि महिलांच्या लेझिम पथकाच्या सहभागामुळे मिरवणुकीला पारंपरिक स्वरूप प्राप्त झाले. लहान मुला-मुलींनी धार्मिक व पारंपरिक वेशभूषा परिधान करून मिरवणुकीत सहभाग घेतला. महिला, बालके आणि परिसरातील नागरिकांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. निलांबरी महिला मंडळाच्या वतीने गेल्या पंधरा वर्षांपासून नवरात्रोत्सवाची परंपरा जपली जात आहे. धार्मिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना प्राधान्य देत मंडळाने परिसरातील महिला व बालकांना एकत्र आणण्याचे काम केले आहे. उत्सवाच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे जतन करणे, सामाजिक एकोपा वाढविणे आणि नव्या पिढीला पारंपरिक मूल्यांची ओळख करून देणे, हा मंडळाच्या उपक्रमांचा मुख्य उद्देश आहे. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत महिला आणि बालकांसाठी संगीत खुर्ची, चित्रकला, लिंबू-चमचा, वेशभूषा आणि वक्तृत्व अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून सहभागी महिलांना आपले कौशल्य दाखविण्याची, तर बालकांना सुप्त कलागुण विकसित करण्याची संधी मिळणार आहे. मुलांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि वक्तृत्वकौशल्य वाढावे, तसेच महिलांचा सांस्कृतिक उपक्रमांतील सहभाग अधिक सक्रिय व्हावा, या हेतूने मंडळाने हा उपक्रम हाती घेतला आहे. धार्मिक उत्सवाबरोबरच मनोरंजन, कला आणि व्यक्तिमत्त्व विकासाला प्रोत्साहन देणाऱ्या या स्पर्धा नवरात्रोत्सवाचे विशेष आकर्षण ठरणार आहेत. यंदाच्या नवरात्रोत्सवात देवीच्या प्रतिष्ठापना स्थळाची वैष्णवी देवी मंदिराच्या प्रतिकृतीवर आधारित आकर्षक सजावट करण्यात आली आहे. मंदिराच्या स्वरूपातील या सजावटीमुळे प्रतिष्ठापना स्थळाला विशेष धार्मिक आणि देखणे स्वरूप प्राप्त झाले आहे. देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांचे ही सजावट लक्ष वेधून घेत आहे. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत दररोज एका कुटुंबाच्या वतीने देवीची आरती करण्यात येणार असून, अष्टमीच्या दिवशी भव्य होमहवनाचे आयोजन करण्यात येणार आहे. गेल्या पंधरा वर्षांपासून धार्मिक परंपरा जपत निलांबरी महिला मंडळ विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबवत आहे. यंदाही देवीची पारंपरिक मिरवणूक, आकर्षक सजावट आणि महिला व बालकांसाठी आयोजित विविध स्पर्धांमुळे दत्त कॉलनीतील नवरात्रोत्सवाला विशेष रंगत प्राप्त झाली आहे.

---

के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या परिसर संचालिका

# प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांना 'रिसर्च एक्सलन्स अँड अकॅडमिक लीडरशिप अवॉर्ड' प्रदान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या परिसर संचालिका प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांना संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान आणि शैक्षणिक नेतृत्वाबद्दल 'रिसर्च एक्सलन्स अँड अकॅडमिक लीडरशिप अवॉर्ड' प्रदान करण्यात आला. काईट क्राफ्ट असोसिएशन व दिल्ली जीआयए यांच्या वतीने दिल्ली येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात त्यांना नुकतेच या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी विविध संशोधन लेखांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास आणि नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन या महत्त्वपूर्ण विषयांवर अभ्यासपूर्ण योगदान दिले आहे. त्या यूके सर्टिफिकेशन अँड इन्स्पेक्शन लिमिटेड कंपनीच्या लीड ऑडिटर म्हणूनही पर्यावरण क्षेत्रात कार्यरत आहेत. पर्यावरण व्यवस्थापन, पर्यावरणविषयक मानके आणि शाश्वत विकासाच्या दृष्टिकोनातून त्या कार्य करीत आहेत. शैक्षणिक क्षेत्रातील अनुभव आणि पर्यावरणविषयक व्यावसायिक कार्य यांचा समन्वय साधत त्यांनी संशोधन क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे त्यांच्या संशोधन लेखांमध्ये 'ग्रीन इकॉनॉमी अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट इन इंडिया : चॅलेंजेस अँड ऑपॉर्च्युनिटीज', 'ग्रीन हायड्रोजन स्कोअर फॉर इंडियन मिशन', 'एन्व्हायर्नमेंटल हॅझर्ड मॅनेजमेंट' तसेच 'बिलीफ ऑफ इंडिजिनस पीपल टुवर्ड्स एन्व्हायर्नमेंट अँड नॅचरल रिसोर्स मॅनेजमेंट' यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश आहे.

सध्याच्या जागतिक तापमानवाढीच्या आणि पर्यावरणीय असमतोलाच्या पार्श्वभूमीवर हरित अर्थव्यवस्था, शाश्वत विकास, पर्यावरणीय धोके आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन या विषयांवरील त्यांचे संशोधन विशेष महत्त्वाचे आहे. संशोधन, शैक्षणिक नेतृत्व आणि पर्यावरण व्यवस्थापन या तिन्ही क्षेत्रांमध्ये त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. या यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक श्री. हस्तीमलजी मुनोत आणि संस्थेचे संचालक श्री. किशोर मुनोत यांनी प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडूनही त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील कार्याला नवी प्रेरणा मिळाली आहे.

---

# स्वच्छता अभियानांतर्गत सेंट विवेकानंद प्रायमरी स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे धडे!




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य स्वच्छता अभियानांतर्गत सेंट विवेकानंद प्रायमरी स्कूलमध्ये अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात महानगरपालिकेच्या वतीने सौ. सुवर्णा वाघ मॅडम यांनी आता दुसरी आणि तिसरीच्या विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधत* स्वच्छतेचे महत्त्व, कचऱ्याचे विविध प्रकार, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, स्वच्छतेच्या चांगल्या सवयी आणि '७ आर' संकल्पना यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच कचऱ्याची निर्मिती झाल्यापासून त्याच्या अंतिम व्यवस्थापनापर्यंतचा प्रवास विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगितला.

दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे, ओला व सुका कचरा वेगवेगळा करणे, कचऱ्याचा पुनर्वापर व पुनर्चक्रण करणे आणि आपला परिसर स्वच्छ ठेवणे या बाबींवर त्यांनी विशेष भर दिला. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधल्यामुळे विद्यार्थ्यांना घनकचरा व्यवस्थापनाची संकल्पना अधिक स्पष्टपणे समजली.

याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांनी आपल्या मनोगतातून स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित केले. त्या म्हणाल्या की, स्वच्छता ही केवळ आपल्या घरापुरती किंवा शाळेपुरती मर्यादित नसून ती प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे. लहानपणापासूनच विद्यार्थ्यांनी स्वच्छतेच्या चांगल्या सवयी अंगीकाराव्यात, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण करावे आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी स्वतः पुढाकार घ्यावा. विद्यार्थ्यांनी स्वतः स्वच्छतेचे पालन करण्याबरोबरच आपल्या कुटुंबीयांनाही याबाबत जागरूक करावे, असे आवाहन त्यांनी केले.

पर्यावरणाचे संरक्षण, प्रदूषणावर नियंत्रण आणि स्वच्छ परिसराची निर्मिती करण्यासाठी प्रत्येकाने सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे, हा महत्त्वपूर्ण संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण होऊन पर्यावरणपूरक सवयी जोपासण्यास प्रेरणा मिळाली.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सौ. अश्विनी देशपांडे, सौ. चांदनी सोनाग्रा, सौ. प्रियांका चारगुंडी, सौ. नम्रता कुकरेजा, सौ. पूजा चोपडा, सौ. अनामिका म्हस्के, सौ. शुभांगी पाखरे तसेच सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

---

# सर्जेपुरा येथील राधा-कृष्ण मंदिरात नवरात्रोत्सवाला भक्तिमय प्रारंभ; विधिवत घटस्थापना

**६० वर्षांची धार्मिक परंपरा कायम! राधा-कृष्ण मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम । कीर्तन, माता की चौकी आणि महाप्रसादाची पर्वणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पंजाबी सनातन धर्मसभेच्या सर्जेपुरा येथील राधा-कृष्ण मंदिरात रविवारी (दि. ११ ऑक्टोबर) सकाळी विधिवत पूजा-अर्चा करून उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात घटस्थापना करण्यात आली. नवरात्रोत्सवाच्या प्रारंभानिमित्त मंदिरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. घटस्थापना कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या शीख व पंजाबी भाविकांनी देवीचा जयघोष करून भक्तिभाव व्यक्त केला.

राधा-कृष्ण मंदिरात गेल्या ६० वर्षांपासून नवरात्रोत्सवानिमित्त घटस्थापना करण्याची आणि विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्याची परंपरा जपली जात आहे. यंदाही ही परंपरा कायम ठेवत मंदिरात नवरात्रोत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे. मंदिर परिसरात आकर्षक फुलांची सजावट आणि विद्युत रोषणाई करण्यात आली असून, त्यामुळे मंदिराचे वातावरण अधिक प्रसन्न आणि भक्तिमय झाले आहे.

नवरात्रोत्सवाच्या कालावधीत भाविकांना भक्तिरसाचा अनुभव घेता यावा, यासाठी दररोज विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महिला मंडळाच्या वतीने दररोज सायंकाळी ४ ते ६ या वेळेत कीर्तन होणार आहे. तसेच दररोज सायंकाळी ७ वाजता मातेची आरती करण्यात येणार आहे. या धार्मिक कार्यक्रमांमुळे भाविकांना एकत्र येऊन देवीची उपासना करण्याची आणि भक्तिमय वातावरणात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. मंदिरातील सजावट, विद्युत रोषणाई आणि धार्मिक कार्यक्रमांमुळे नवरात्रोत्सवाचा उत्साह अनुभवायला मिळत आहे.

नवरात्रोत्सवानिमित्त बुधवारी (दि. १४ ऑक्टोबर) रात्री ८ वाजता मंदिरात 'माता की चौकी' या विशेष धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात कलाकारांच्या वतीने देवीची भक्तिगीते सादर करण्यात येणार आहेत. भक्तिगीतांच्या माध्यमातून देवीचा महिमा आणि भक्तिभाव व्यक्त केला जाणार आहे. भक्तिगीतांच्या कार्यक्रमानंतर देवीची आरती होणार असून, आरतीनंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मंदिर ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

सोमवारी (दि. १९ ऑक्टोबर) सकाळी ९.३० वाजता महिला भजन मंडळीच्या उपस्थितीत पूर्णाहुती यज्ञ संपन्न होणार आहे. नवरात्रोत्सवातील या धार्मिक कार्यक्रमात भाविकांना सहभागी होण्याचे आवाहन राधा-कृष्ण मंदिर ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

---

# वारकरी संप्रदायाला हायजॅक करण्याच्या प्रयत्नांविरोधात प्रतिक्रांतीची गरज- अभिजीत कांबळे




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सध्या वाचकांपेक्षा रिल्स व शॉर्ट व्हिडिओ पाहणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. पुढील पिढीला दिशा देण्यासाठी प्रभावी आणि चांगल्या व्हिडिओंसारख्या माध्यमांतून समाजात सकारात्मक बदल घडवता येऊ शकतात. सोशल मीडियावरील चुकीच्या गोष्टी थांबविण्यासाठी हस्तक्षेप करून समाजाला चांगल्या गोष्टी देणे आणि समाजपरिवर्तनासाठी माध्यम म्हणून काम करणे आवश्यक आहे. पुरोगामी असलेल्या वारकरी संप्रदायाला हायजॅक करण्याचे काम प्रतिगामी शक्ती करत आहेत. वारकरी संप्रदायात घुसून त्याचा कब्जा घेण्याचे काम सुरू असून, त्याविरोधात प्रतिक्रांती करण्यासाठी पुढाकार घ्यावा लागणार आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार अभिजीत कांबळे यांनी केले.

'दिंडी : वे ऑफ लाइफ' या निरीक्षणात्मक लघुपटाची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठित फिल्म फेस्टिव्हलमध्ये निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर शहरातील सकल भारतीय समाजाच्या वतीने लघुपटाचे दिग्दर्शक भैरवनाथ वाकळे व उज्वला वाकळे यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. शहरातील रहेमत सुलतान सभागृहात या लघुपटाचे स्क्रीनिंग आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात अभिजीत कांबळे बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सिने अभ्यासक प्रा. संदीप गिऱ्हे उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना ज्येष्ठ पत्रकार अभिजीत कांबळे म्हणाले की, २०१४ पासून वातावरण बदलले. अहिल्यानगरमध्ये चळवळीतील कार्यकर्ते २०१४ पूर्वी आणि त्यानंतरही प्रस्थापितांविरोधात चळवळ चालवतात, हे विशेष आहे. आपले म्हणणे मांडण्यासाठी नवीन फॉर्म निवडताना व्हिडिओ हे सर्वोत्तम माध्यम ठरत आहे. सामाजिक व परिवर्तनवादी विषय लिहिण्यापेक्षा व्हिडिओचा परिणाम अधिक होतो. वाचन कमी होत असल्याची खंत व्यक्त करत त्यांनी सांगितले की, नवीन पिढीदेखील सोशल मीडियावर शॉर्ट व्हिडिओ पाहणे पसंत करते. तरुण वर्गापर्यंत पोहोचण्यासाठी हे उत्तम माध्यम आहे. तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण झाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

---

# राज्यस्तरीय याजकीय सन्मान सोहळ्यात ६० याजकांचा गौरव

**अहिल्यानगर येथे विविध जिल्ह्यांतील याजकांचा सन्मान; सामाजिक योगदानाचा केला गौरव**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** स्व. अशोक श्रीसुंदर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, संभाजीनगर आणि साप्ताहिक उपदेशक, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय याजकीय सन्मान सोहळ्यात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील ६० याजकांचा सन्मान करण्यात आला. संजोग लॉन येथे सुशिलाताई श्रीसुंदर यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी याजकांच्या धार्मिक, सामाजिक आणि समाजप्रबोधनाच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन रेव्ह. सतीश तोरणे यांच्या हस्ते झाले. यावेळी रेव्ह. रवी चांदेकर, स्टिवन गोडे, ॲड. विनायक पंडित, रेव्ह. सुनंदा त्रिभुवन, पा. दशरथ रणपिसे, बिशप शमुवेल भिंगारदिवे, प्रेषित सुनील गंगावणे, शरयू किशोर ब्राह्मणे आणि पंकजदादा चांदोरकर आदी मान्यवर उपस्थित होते.अध्यक्षीय भाषणात सुशिलाताई श्रीसुंदर यांनी, योग्य प्रशिक्षण घेऊन विविध संस्थांच्या माध्यमातून समाजसेवा करणाऱ्या आणि समाजाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान होणे आवश्यक असल्याचे सांगितले. अशा सन्मानामुळे सेवाभावी कार्य करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळते, असेही त्यांनी नमूद केले. उद्घाटनप्रसंगी रेव्ह. सतीश तोरणे यांनी प्रभूच्या वचनातून उपस्थितांना मार्गदर्शन केले आणि पुरस्कारप्राप्त याजकांना शुभेच्छा दिल्या.

साप्ताहिक उपदेशकचे संपादक जॉर्ज क्षेत्रे यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला. गेल्या २० वर्षांपासून साप्ताहिक उपदेशकच्या माध्यमातून शिक्षक, परिचारिका आणि समाजभूषण पुरस्कार देऊन विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा गौरव करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच वधू-वर मेळावे, महिला शिबिरे, आरोग्य शिबिरे अशा विविध उपक्रमांची माहिती दिली. याजक समाजाला योग्य दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. त्यांच्या सेवेचा सन्मान करणे ही सामाजिक बांधिलकी असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. रेव्ह. रवी चांदेकर यांनी याजकीय सेवा बजावताना येणाऱ्या अडचणी आणि या सेवेतून मिळणाऱ्या दैवी आशीर्वादांविषयी विचार मांडले. स्टिवन गोडे यांनी उपस्थित याजकांना कायदेविषयक मार्गदर्शन केले. बिशप शमुवेल भिंगारदिवे यांनी देवाचा सेवक दुप्पट सन्मानास पात्र असल्याचे सांगितले. यावेळी रेव्ह. सुनील गंगावणे, रेव्ह. सुनंदा त्रिभुवन आणि पा. दशरथ रणपिसे यांनीही मार्गदर्शन केले.

अहिल्यानगर, संभाजीनगर, नाशिक, पुणे, मुंबई, जालना यांसह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या याजकांचा या सोहळ्यात सन्मान करण्यात आला. सी.एन.आय., सॅल्व्हेशन आर्मी तसेच स्वतंत्र आचार्यांचा सन्मानपत्र, मानचिन्ह, पदक आणि शाल देऊन गौरव करण्यात आला. अध्यक्ष, उद्घाटक आणि प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते एकूण ६० याजकांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल पटेकर यांनी केले, तर विक्रम गायकवाड यांनी आभार मानले. रेव्ह. दीपक पाडळे यांनी समारोपाची प्रार्थना केली, तर रेव्ह. गंगोदक यांनी आशीर्वाद दिले. भोजनापूर्वी रेव्ह. आनोश शिरसाठ यांनी प्रार्थना केली. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी विक्रम गायकवाड, रेव्ह. रवी चांदेकर, रेव्ह. सतीश तोरणे, रेव्ह. दीपक पाडळे, ब्रदर प्रवीण साबळे, ब्रदर सुधाकर पाटोळे, ब्रदर लुकस पाटोळे आणि कविता विक्रम गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

---

# पितृ पंधरवड्यानिमित्त आधार आपुलकी फाउंडेशनचा आप्तभोजन उपक्रम; आजी-आजोबांनी वाढविले मायेचे नाते

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पितृ पंधरवड्यात अन्नदानाला विशेष महत्त्व असून, गरजू व्यक्तींपर्यंत अन्न पोहोचविण्याच्या सामाजिक भावनेतून आधार आपुलकी फाउंडेशनच्या वतीने सर्वपित्री अमावस्येनिमित्त युवान संस्थेतील युवा अंकुरांसाठी आप्तभोजनाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे हे सलग तिसरे वर्ष असून, अन्नदानासोबतच प्रेम, आपुलकी आणि माणुसकीची नाती जपण्याचा सुंदर संदेश या माध्यमातून देण्यात आला.

पितृ पंधरवड्यातील शेवटच्या दिवशी म्हणजेच सर्वपित्री अमावस्येला आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमामागे गरजू व्यक्तींना प्रेमाने अन्नदान करून सामाजिक बांधिलकी जपण्याची संकल्पना आहे. आधार आपुलकी फाउंडेशनमधील आजी-आजोबा स्वतःच्या हातांनी प्रेमपूर्वक भोजन तयार करतात आणि युवान संस्थेतील युवा अंकुरांना आपुलकीने जेवण वाढतात. या उपक्रमामुळे केवळ अन्नदान होत नाही, तर आजी-आजोबा आणि नातवंडे यांच्यातील जिव्हाळ्याचे नातेही अधिक दृढ होते. प्रेमाने बनविलेले भोजन, मायेने केलेले आदरातिथ्य आणि एकमेकांशी संवाद साधण्यातून या उपक्रमाला कौटुंबिक स्नेहाची सुंदर किनार लाभते. समाजातील गरजू घटकांना आपलेपणाची जाणीव करून देतानाच, अन्नाचा आदर आणि दानाचे महत्त्व अधोरेखित करणारा हा उपक्रम सामाजिक संवेदनशीलतेचे उदाहरण ठरत आहे.

या प्रसंगी युवान संस्थेचे संस्थापक संदीप कुसळकर, सचिव सुरेश मैड, समाजकल्याण अधिकारी श्री. मुरकुटे तसेच आधार आपुलकी फाउंडेशनचे सर्व सन्माननीय आजी-आजोबा उपस्थित होते. सामाजिक जाणीव, सेवाभाव आणि कौटुंबिक आपुलकी यांचा संगम घडविणाऱ्या या उपक्रमातून माणुसकी जपण्याचा आणि समाजातील प्रत्येक घटकाला प्रेमाने जोडण्याचा संदेश देण्यात आला.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य व पत्नी स्वाती वैद्य यांच्या हस्ते विधिवत पूजा व महाअभिषेक



अहिल्यानगर - शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त पाईपलाईन रोड येथील श्री तुळजाभवानी माता मंदिरात धार्मिक उत्साहात आणि मंगलमय वातावरणात घटस्थापना व महाअभिषेक सोहळा संपन्न झाला. तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य व त्यांच्या पत्नी स्वाती वैद्य यांच्या हस्ते विधिवत पूजा करून घटस्थापना करण्यात आली. यावेळी श्री तुळजाभवानी मातेच्या जयघोषाने तसेच 'आंबे आंबे, उदो उदो'च्या घोषणांनी मंदिर परिसर दुमदुमून गेला. मंदिरात विविध फुले व कमळांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती. यावेळी मंदिराचे संस्थापक अशोक कानडे, सुनीता कानडे, अध्यक्ष ओमप्रकाश तिवारी, सचिव नवनाथ आंधळे, अशोक गायकवाड स्मिता शितोळे, दत्तात्रेय तांबे, सागर पुंड, गणेश बाबर, सोनिया मुळे यांच्यासह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य म्हणाले की, आपले सण-उत्सव आनंदाने, उत्साहाने आणि पारंपरिक पद्धतीने साजरे करावेत. आपल्या सण-उत्सवांमधून भारतीय संस्कृती आणि सांस्कृतिक वारसा जपला जातो. पाईपलाईन रोड येथील श्री तुळजाभवानी माता मंदिरात शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त आपल्या हस्ते घटस्थापना झाली, याचा आनंद आहे. हा नवरात्रोत्सव शांततेत, भक्तिभावाने आणि धार्मिक परंपरेनुसार साजरा करावा, असे आवाहन त्यांनी केले.

### पारनेर येथे २० व्या आंतर जिल्हा राष्ट्रीय ॲथलेटिक्स निवड चाचणी उत्साहात

अहिल्यानगर - अहिल्यानगर जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेच्या वतीने आयोजित २० व्या आंतर जिल्हा राष्ट्रीय ॲथलेटिक्स-अहिल्यानगर जिल्हा संघ निवड चाचणी (२०२६) पारनेर येथील 'न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेज'च्या मैदानावर नुकतीच मोठ्या उत्साहात पार पडली. या निवड चाचणीतून जिल्ह्याचे राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करण्यासाठी १३ गुणवंत खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. या निवड चाचणीचे उद्घाटन अहिल्यानगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कॉलेजचे क्रीडा संचालक प्रा. डॉ. संजय गायकवाड, एनसीसी () विभागप्रमुख प्रा. भरत डगळे, प्रा. गंगाराम खोडदे सर, न्यू इंग्लिश स्कूलचे क्रीडा प्रमुख तथा तालुका शालेय क्रीडा अध्यक्ष बापूराव होळकर सर, एम.ई.टी. स्कूलचे फिजिकल डायरेक्टर अक्षय शिंदे, आणि स्टेला मारीस हंगाचे ऋषीकेश औटी आदी मान्यवर उपस्थित होते.स्पर्धेचे पंच व व्यवस्थापक म्हणून श्रीरामसेतू आवारी, संदीप घावटे, गुलजार शेख, बापूसाहेब गायकवाड, सौरभ वरखडे, समीर शेख, गणेश आघाडे, सतीश भालेराव आणि अरविंद दिवे यांनी चोख काम पाहिले. राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेले १३ खेळाडूंची निवड करण्यात आलेली आहे. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे पूर्ण भारत देशामधून प्रत्येक जिल्ह्यामधून १३ खेळाडूंचा संघ या ठिकाणी उपस्थित राहणार आहे. या राष्ट्रीय स्पर्धेसाठी सहभागी होणाऱ्या सर्व खेळाडूंची राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात येणार आहे. या स्पर्धेचे आयोजन ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया व हैदराबाद सरकार करणार आहे. निवड झालेले हे सर्व खेळाडू आगामी राष्ट्रीय स्पर्धा हैदराबाद (१४ व १६ नोव्हेंबर २०२६) येथे होणाऱ्या आंतर जिल्हा राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील, अशी माहिती स्पर्धा आयोजक दिनेश भालेराव यांनी माहिती दिली. सर्व निवडक खेळाडूंचे अध्यक्ष सुनील जाधव, उपाध्यक्ष राजेंद्र कोतकर, प्रसाद डागवाले यांच्यासह अहिल्यानगर जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे पदाधिकारी, क्रीडाप्रेमी व उपस्थितांनी अभिनंदन करून खेळाडूंना राष्ट्रीय स्पर्धेतील पुढील कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# दुष्काळात जलतरण तलावांचा पाण्याचा उधळपट्टीचा खेळ कशासाठी?; सरकारी-खासगी स्विमिंग पूल तातडीने बंद करा!

## जनावरांना पाणी नाही, ग्रामीण भागात चारा छावण्यांची मागणी; सामाजिक कार्यकर्ते नेते भुतारे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगरसह मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांमध्ये दुष्काळाची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असताना, दुसरीकडे मात्र जलतरण तलावांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर सुरू आहे. एकीकडे ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत आहे, तर दुसरीकडे सरकारी, खासगी, हॉटेलमधील आणि गृहसंकुलांमधील जलतरण तलावांसाठी मोठ्या प्रमाणावर पाणी खर्च केले जात आहे. दुष्काळाच्या या भीषण परिस्थितीत पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी राज्यातील सर्व सरकारी आणि खासगी जलतरण तलाव तातडीने बंद करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते नेते नितीन भुतारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

राज्यातील अनेक शहरांमध्ये तसेच पर्यटनस्थळांच्या परिसरात सरकारी आणि खासगी जलतरण तलाव आहेत. याशिवाय मोठमोठी हॉटेल्स, क्लब, रिसॉर्ट, व्यायामशाळा आणि काही गृहसंकुलांमध्येही जलतरण तलाव उभारण्यात आले आहेत. या तलावांमध्ये नियमितपणे पाणी भरावे लागते. पाण्याची स्वच्छता राखण्यासाठी प्रक्रिया केली जात असली, तरी पाण्याचे बाष्पीभवन, गळती, देखभाल आणि वेळोवेळी पाणी बदलण्याची गरज यामुळे पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. त्यामुळे राज्यात पाणीटंचाईचे संकट गडद होत असताना जलतरण तलावांसाठी होणारा पाण्याचा वापर हा सार्वजनिक हिताच्या दृष्टीने गंभीर प्रश्न बनला आहे.

**एका बाजूला पिण्याच्या पाण्याची चिंता, दुसरीकडे मनोरंजनासाठी पाण्याचा वापर!**

दुष्काळाच्या काळात पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी आणि शेतीसाठी उपलब्ध असलेल्या मर्यादित जलसाठ्याचे नियोजन करणे अत्यंत आवश्यक असते. ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये पाणीपुरवठ्याची व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी प्रशासनाला टँकरचा आधार घ्यावा लागतो. काही ठिकाणी विहिरी, बोअरवेल आणि स्थानिक पाणीस्रोतांची पाणीपातळी घटत असल्याने नागरिकांसमोर पाणीटंचाईचे संकट उभे राहण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत जलतरण तलावांसारख्या तुलनेने कमी प्राधान्याच्या वापरासाठी पाणी उपलब्ध करून देण्याऐवजी नागरिकांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. जलतरण तलावांमध्ये वापरले जाणारे पाणी दर सात दिवसांनी बदलावेच लागते, असा सर्वत्र एकच नियम नसला, तरी पाण्याची गुणवत्ता, स्वच्छता आणि आरोग्यविषयक निकषांनुसार त्याची नियमित तपासणी व प्रक्रिया करावी लागते. काही परिस्थितींमध्ये पाणी बदलण्याचीही गरज भासते. तलावातील पाणी स्वच्छ करण्यासाठी आधुनिक यंत्रणा वापरल्या जात असल्या, तरी पाण्याची हानी पूर्णपणे टाळता येत नाही. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीत या तलावांचा वापर नियंत्रित करणे किंवा तात्पुरते बंद ठेवणे हा पर्याय गांभीर्याने विचारात घ्यावा, अशी भूमिका भुतारे यांनी मांडली आहे.

**जनावरांच्या घशाला कोरड; मग जलतरण तलाव सुरू ठेवण्याचा अट्टहास कशासाठी?**

दुष्काळाचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर आणि पशुपालकांना बसतो. पावसाने ओढ दिल्याने चारा उत्पादनावर परिणाम होतो आणि जनावरांसाठी चारा व पाणी उपलब्ध करून देण्याचे मोठे आव्हान निर्माण होते. जनावरांना पुरेसे पाणी मिळाले नाही, तर त्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याबरोबरच दूध उत्पादनातही घट होऊ शकते. अशा वेळी चारा छावण्या सुरू कराव्यात, पशुधनासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी ग्रामीण भागातून होत आहे. एका बाजूला पशुधन जगविण्यासाठी पाण्याचे नियोजन करण्याची वेळ आली असताना दुसरीकडे मनोरंजनासाठी वापरल्या जाणाऱ्या जलतरण तलावांवर पाणी खर्च होणे ही विसंगती असल्याचे भुतारे यांनी निवेदनात नमूद केले आहे. दुष्काळाच्या काळात पाण्याच्या वापराला प्राधान्यक्रम ठरवून सर्वप्रथम पिण्याचे पाणी, पशुधन आणि अत्यावश्यक गरजांसाठी पाणी राखून ठेवले पाहिजे. त्यानंतरच अन्य वापरांचा विचार व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

**सरकारी तलावांसोबत खासगी तलावांवरही निर्बंध आणा!**

केवळ सरकारी जलतरण तलाव बंद करून हा प्रश्न सुटणार नाही. खासगी क्लब, हॉटेल्स, रिसॉर्ट, सोसायट्या आणि इतर व्यावसायिक आस्थापनांमधील जलतरण तलावांवरही दुष्काळाच्या काळात निर्बंध आणणे आवश्यक आहे. संबंधित तलावांमध्ये पाणी कोणत्या स्रोतामधून आणले जाते, त्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर होतो का आणि पाण्याचा पुनर्वापर करण्याची व्यवस्था आहे का, याची तपासणी करण्याची गरज आहे. राज्य सरकारने दुष्काळग्रस्त भागांतील परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार जलतरण तलाव तात्पुरते बंद ठेवण्याचा निर्णय घ्यावा. ज्या भागांत पाणीटंचाई तीव्र आहे, तेथे पाण्याचा अनावश्यक वापर करणाऱ्या आस्थापनांवर निर्बंध घालावेत. पाण्याचा पुनर्वापर, गळती रोखणे आणि पाणी बचतीच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठीही स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे

११०० किलोमीटरची पायपीट, मनात देवीचा ध्यास!

## पद्मावती मातेच्या दिव्य ज्योतीचे शेवगावात भक्तिमय जल्लोषात स्वागत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** श्रद्धेची ज्योत हाती, ओठांवर देवीचा जयघोष आणि मनात अढळ भक्तीचा ध्यास अशा भक्तिमय वातावरणात 'जय भवानी मित्र मंडळ', वडार समाज, शेवगाव यांच्या वतीने आयोजित माता पद्मावती (तिरुपती बालाजी) ते शेवगाव दिव्य ज्योत पायी यात्रा सोहळा २०२६ उत्साहात पार पडला. तब्बल ११०० किलोमीटरचा खडतर प्रवास पूर्ण करून दिव्य ज्योत शेवगावात दाखल होताच भक्तांनी जल्लोषात स्वागत केले.

देवीवरील अपार श्रद्धा, तरुणांचा उत्साह आणि एकजुटीची ताकद यांचा अनोखा संगम या यात्रेत पाहायला मिळाला. हैदराबाद मार्गे तुळजापूर, येडेश्वरी आणि बीड असा प्रवास करत ज्योत घेऊन तरुण शेवगावात पोहोचले. गोपाल अण्णा कुसळकर, पंडित कुसळकर, रामनाथ कुसळकर, सुरेश सुपारे, गणेश सुपारे, गणेश कुसळकर यांच्यासह समाजातील सुमारे ६० तरुण या भक्तिमय उपक्रमात सहभागी झाले होते.

शेवगाव शहरातील क्रांती चौक येथे ज्योत दाखल होताच वडार समाजातील महिला-भगिनी आणि देवीच्या बाजारपेठेतील भाविकांनी भव्य मिरवणुकीने स्वागत केले. ढोल-ताशांचा गजर, डॉल्बीचा निनाद, फटाक्यांची आतषबाजी आणि 'जय माता पद्मावती'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. पारंपरिक पद्धतीने ज्योत वडार गल्लीतील बालाजी मंदिरापर्यंत नेण्यात आली. ही केवळ पायपीट नव्हती, तर श्रद्धेने जोडलेल्या मनांची आणि भक्तीने उजळलेल्या संकल्पाची यात्रा होती. पद्मावती मातेच्या दिव्य ज्योतीने शेवगावात भक्ती, एकता आणि उत्साहाचा प्रकाश पसरवला असून, या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## शारदीय नवरात्रोत्सव.. व्याख्यानमालेत.. साहित्य, कला, गायन अशा विविध नवरसाची पर्वणी– ह.भ.प. निळकंठ देशमुख



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सनातन धर्मसभा अहिल्यानगर आयोजित, शारदीय नवरात्रोत्सव व्याख्यानमालेत आज दिनांक १२ ऑक्टोबर २६ रोजी, दुसरे पुष्प, देवी महात्म्य सदरात आधुनिक दुर्गा हा कथालेखक बाळासाहेब देशमुख यांचा प्रयोग संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह भ प निळकंठ देशमुख हे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले शारदीय नवरात्रोत्सव व्याख्यानमालेला १२३ वर्षाची परंपरा आहे. या शारदीय नवरात्रोत्सव व्याख्यानमालेत दरवर्षी साहित्य, कला, गायन, भजन,अध्यात्म अशा नवरसाची पर्वणी श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून जाते. आजवर अनेक कलाकार, तंत्रज्ञ, साहित्यिक, व्याख्याते यांनी व्याख्यानमालेत आपली सेवा दिलेली आहे. त्यातून समाज प्रबोधन, संस्कार , विचार चिंतन झालेले दिसून येते. कथालेखक बाळासाहेब देशमुख यांची आधुनिक दुर्गा कथन देखील वास्तवाचे भान देणारे होते.

कथालेखक बाळासाहेब देशमुख यांनी आधुनिक दुर्गा सादर करताना बिकट परिस्थितीतील दुर्गा, कमी शिक्षण घेतलेली दुर्गा, अनुभवाच्या जोरावर,अनेक संकटे झेलत , दगड, मूर्ती ऐवजी पंचमहाभूतामध्ये आपला देव पहाणारी, डोळस श्रद्धा बाळगत, आपला जीवन प्रवास सुखकर करून दाखवते.

बाळासाहेब देशमुख यांनी सकस कथानक, शब्द फेक, अभिनय , आवाजाची शैली, यावरती श्रोते वर्गाची मने जिंकली. संस्थेचे पदाधिकारी दिनकर देशमुख व एडवोकेट अच्युतराव पिंगळे या मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत परिचय दिनकर देशमुख यांनी करून दिला. ट्रस्ट मंत्री रमेश देशपांडे यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी धर्मसभेचे ट्रस्टी वेदमूर्ती चकोर मुळे ,उमेश वाळुंजकर यांनी मंत्रघोष करून दुर्गा मातेची पूजन केले धर्मसभेचे समीर उपाध्ये ,अनंत देशपांडे, सेवानिवृत्त बँक अधिकारी हेमंत देशमुख एडवोकेट अच्युत पिंगळे इत्यादी मान्यवरांसह बंधू-भगिनी हजर होते.

## बुऱ्हानगर येथे आदिशक्ती मोफत महाआरोग्य शिबीराचे शुभारंभ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल व रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर डिग्निटी यांच्या संयुक्त विद्यमाने बुऱ्हानगर देवी, बुऱ्हानगर येथे दिनांक ११ ते १८ ऑक्टोबर २०२६, सकाळी १० ते सायंकाळी ६ या कालावधीत मोफत महाआरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिराचे उद्घाटन डी वाय एस पी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. प्रमुख पाहुणे म्हणून नाना जाधव (प्रांत संघ चालक), संपादक हनुमंतराव पाटील, पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात, सीडीजी रो. शिरीष रायते, रो.डॉ. प्रकाश गरुड, रो. डॉ. प्रकाश कांकरीया, रो.डॉ. सुधा कांकरीया, रो.एड.अभिषेक भगत (अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर डिग्निटी), रो. डॉ. वैशाली पाटील (सचिव), रो. अमर गुरप (अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल), रो. सुनील मुथा (सचिव), रो. डॉ. कुणाल कोल्हे (प्रोजेक्ट चेअरमन), रो. अभय राजे (प्रोजेक्ट समन्वयक), रो. राहुल जामगावकर (प्रोजेक्ट व्यवस्थापक), डॉ. रोहित कानडे (आयुष्यमान भारत कार्ड), डॉ. राजहंस मॅडम (प्राचार्य वाय सी डी सी डेंटल कॉलेज), अहिल्यानगर ब्लड बँक, डॉ. छाजेड (आनंद ऋषीजी नेत्रालय) आदी मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर डिग्निटीचे अध्यक्ष ॲड. अभिषेक भगत यांच्या प्रास्ताविक भाषणाने झाली. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांनी मनोगत व्यक्त करत शिबिरास शुभेच्छा दिल्या.

या शिबिरात मोफत दंत तपासणी, नेत्र तपासणी, कॅन्सर तपासणी, ब्लड, बीपी, शुगर तपासणी, आयुष्यमान भारत आरोग्य कार्ड तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. विशेष म्हणजे या शिबिरात रक्तदान करणाऱ्या भाविकांना तात्काळ देवीचे दर्शन देखील देण्यात येत आहे. सर्व भाविकांनी या शिबिराचा लाभ अवश्य घ्यावा असे आव्हान आयोजिकांनी केले आहे.

या प्रसंगी रोटरीचे रो.सौ.उज्ज्वला रोजे, रो.सौ. कविता भगत, रो. डॉ. प्रदीप चौभे, रो.आशुतोष लांडगे, रो.दादा करंजुले, रो. डॉ. अजिता चौभे, रो. अंकुर बोरकर, रो. हर्षद मुळे, रो. श्वेता मुळे, रो. पुष्कर वैकर, रो. कश्मिरा जामगावकर, रो. डॉ. श्रीकृष्ण जोशी, रो.सौ. वैजयंती जोशी, रो. डॉ. किर्ती कोल्हे, रो. मनिष बोरा, रो. सुनील कटारिया, रो.हरीश नय्यर, रो.चेतन अमरापुरकर, रो. ईश्वर बोरा, रो. प्रसन्न खाजगीवाले, रो. विजय जुंद्रे, रो. प्रभाकर बोगा आदी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलचे अध्यक्ष रो. अमर गुरप यांनी केले.अधिक माहिती साठी ९९२३३८७२७२ / ९८६०२४९००५ / ९९२३२८४२४२ या नंबर वर संपर्क करण्याचे आयोजकांनी आवाहन केले आहे.

## पत्रकार बाबासाहेब पालवे यांची मराठी राजभाषा संवर्धन कृती समितीच्या जिल्हा प्रसिद्धीप्रमुखपदी निवड!



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मराठी भाषेचा प्रचार-प्रसार, संवर्धन आणि मराठीला ज्ञानभाषेचा दर्जा प्राप्त करून देण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या मराठी राजभाषा संवर्धन कृती समितीच्या अहिल्यानगर जिल्हा प्रसिद्धीप्रमुखपदी पत्रकार श्री. बाबासाहेब पालवे यांची निवड करण्यात आली आहे.

मराठी राजभाषा संवर्धन कृती समितीच्या अध्यक्षा सौ. सुलोचना अमोल क्षीरसागर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच समितीच्या कार्यविस्तारासाठी प्रयत्नशील असलेले श्री. अमोल क्षीरसागर सर यांच्या उपस्थितीत पत्रकार श्री. बाबासाहेब पालवे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

मराठी भाषेचा गौरव वाढविणे, मराठी भाषेच्या संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविणे, मराठी शाळांचे महत्त्व समाजासमोर मांडणे तसेच मराठी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी जनजागृती करणे, ही समितीची प्रमुख उद्दिष्टे आहेत. या कार्याची माहिती प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी जिल्हा प्रसिद्धीप्रमुख म्हणून श्री. पालवे यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारे आणि लोकहिताच्या विषयांना प्रसिद्धी देणारे श्री. बाबासाहेब पालवे यांच्या अनुभवाचा समितीच्या कार्यविस्तारासाठी निश्चितच लाभ होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. त्यांच्या निवडीबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन होत असून, मराठी भाषेच्या संवर्धनासाठी त्यांच्या हातून प्रभावी कार्य घडावे आणि समितीच्या उपक्रमांना व्यापक प्रसिद्धी मिळावी, अशा शुभेच्छा देण्यात आल्या. मराठी भाषेचा सन्मान, संवर्धन आणि प्रचार-प्रसार या ध्येयासाठी पत्रकारितेच्या माध्यमातून भरीव योगदान देण्याची संधी या नियुक्तीमुळे उपलब्ध झाली आहे.

# स्वप्न पाहण्यासाठीही पात्रता लागते; जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यश मिळवा!

## उद्योजक, लेखक शरद तांदळे यांचा युवकांना यशाचा कानमंत्र; माऊली संकुलातील मार्गदर्शन मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जीवनात यशस्वी होण्यासाठी केवळ स्वप्न पाहून चालत नाही, तर त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी जिद्द, चिकाटी, मेहनत आणि सातत्य आवश्यक असते. स्वप्न पाहण्यासाठीही पात्रता लागते आणि ती वाचन, ज्ञान व योग्य विचारांतून निर्माण होते. प्रत्येकाने वाचनाचा छंद जोपासावा, आपल्या क्षेत्राची निवड करून त्यात सातत्य ठेवावे, निर्णयक्षमता वाढवावी आणि वेळेचा सदुपयोग करावा. मोबाईलमध्ये वाया जाणारी ऊर्जा विधायक कामासाठी वापरावी, असे आवाहन उद्योजक व लेखक शरद तांदळे यांनी केले.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने माऊली संकुल येथे उद्योजक व लेखक शरद तांदळे यांच्या 'स्वप्न ते उद्योजक' मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला विद्यार्थी व युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावल्याने माऊली संकुल हाऊसफुल झाले. यावेळी तांदळे यांनी उद्योजकता, वाचन, वेळेचे नियोजन, व्यावसायिक ज्ञान, निर्णयक्षमता आणि यशस्वी जीवनासाठी आवश्यक असलेल्या गुणांवर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला महापौर ज्योतीताई गाडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, उद्योजक मोहनशेठ मानधना, आशिष पोखरणा, ईश्वर बोरा, सुमित सोनवणे, उपायुक्त मेहर लहारे, नगरसेवक सुरेश बनसोडे, बाळासाहेब पवार, डॉ. सागर बोरुडे, करण कराळे, प्राध्यापक माणिकराव विधाते, साहेबराव सप्रे, ॲड. युवराज शिंदे, श्रेणिक शिंगवी, किरणताई बारस्कर, गोरख पडोळे, अमोल येवले, अनिल बोरुडे, मयूर बांगरे, संभाजी पवार, योगेश गलांडे आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, विद्यार्थी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शरद तांदळे म्हणाले की, चिरीमिरी देऊन मिळविलेले यश क्षणिक असते. आपण जे शिकतो ते योग्य आहे की नाही, याचेही भान ठेवले पाहिजे.

# शिर्डी उपविभागातील राहाता व कोपरगाव येथे महसूल लोकअदालतीचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी–**महसूल प्रशासनातील वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले जमीन व महसूलविषयक दावे, अपील तसेच अन्य अर्धन्यायिक प्रकरणांचा जलद आणि परस्पर संमतीने निपटारा करण्यासाठी दि. २८ ऑक्टोबर २०२६ आणि १६ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता राहाता व कोपरगाव तहसील कार्यालयात स्वतंत्रपणे या लोकअदालती पार पडतील.

महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोकअदालत अभियाना अंतर्गत शिर्डी उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या विशेष महसूल लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. शिर्डी उपविभागातील अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या पात्र प्रकरणांचा या लोकअदालतीमध्ये समावेश करण्यात येणार आहे. यामध्ये महसुली दावे व अपील, रस्ता वहिवाटीचे दावे, वारस नोंदी, अधिकार अभिलेखांशी संबंधित प्रकरणे, ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियमांतर्गत प्रकरणे, तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ८५ अन्वये वाटपाची प्रकरणे आदींचा समावेश असेल.

लोकअदालतीच्या माध्यमातून दोन्ही पक्षकारांच्या परस्पर संमतीने वाद मिटवण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. याचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पक्षकारांनी किंवा त्यांच्या अधिकृत वकिलांनी, प्रकरण प्रलंबित असलेल्या अर्धन्यायिक न्यायालयात अथवा कार्यालयात निर्धारित प्रपत्र–अ मध्ये तडजोडीसाठी अर्ज सादर करावा. अर्जांची छाननी करून संमती निश्चित झाल्यानंतर कायदेशीर प्रक्रियेद्वारे तडजोडनामा घेतला जाईल. लोकअदालतीच्या दिवशी दोन्ही पक्षकारांच्या संमतीने अंतिम आदेश पारित करून प्रकरणांचा कायद्यानुसार निपटारा करण्यात येईल.

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले महसूल व जमिनीचे वाद परस्पर सामंजस्याने सोडवण्यासाठी संबंधित पक्षकारांनी विहित प्रक्रिया वेळेत पूर्ण करून या अभियानाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी माणिक आहेर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# आय.एम.एस. संस्थेत मॅनेजमेंट गेम्स २०२६ उत्साहात संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** बी.पी.एच.ई. इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड करिअर डेव्हलपमेंटमध्ये मॅनेजमेंट गेम्स २०२६ उत्साहात पार पडले. यंदा या गेम्सची संकल्पना वसुधैव कुटुंबकम् – संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे अशी होती.

एकम, संगम, मैत्री, सहयोग, युक्ती, सहभागिता, समरस्य, विश्व, दक्षता आणि चातुर्य अशा दहा संघात विद्यार्थ्यांची विभागणी करण्यात आली. रील मेकिंग, ब्रँड वॅगन, अ‍ॅड मॅड शो, मॉक स्टॉक, एच.आर. टीम बिल्डिंग, बेस्ट मॅनेजर व स्पॉन्सरशिप अशा विविध स्पर्धांमध्ये सर्व संघांनी हिरीरीने सहभाग घेतला.

यावेळी आयएमएसचे सल्लागार डॉ.एम.बी.मेहता, प्रभारी संचालिका डॉ. प्रणोती तेलोरे, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, विभाग प्रमुख डॉ. हतीम कयूमी व सर्व प्राध्यापक उपस्थित होते. डॉ. एम. बी. मेहता यांनी आयोजन समितीने निवडलेल्या समर्पक संकल्पनेबद्दल कौतुक केले व विद्यार्थ्यांना खेळांमध्ये सक्रिय सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित केले. डॉ. प्रणोती तेलोरे यांनी खेळांचे महत्त्व विशद करून खेळाची भावना जपण्याचे आवाहन केले. डॉ. विक्रम बार्नबस यांनी हार–जीत हा खेळाचा अविभाज्य भाग असून सहभाग अधिक महत्त्वाचा असल्याचे सांगितले. डॉ. हातिम कयूमी यांनी सर्व सहभागींना शुभेच्छा दिल्या.

विविध स्पर्धातील विजेते व उपविजेता संघ पुढीलप्रमाणे – रिल मेकिंग – युक्ती व मैत्री, स्पॉन्सरशिप – मैत्री व दक्षता, ब्रँड वॅगन– मैत्री व युक्ती, अ‍ॅड मॅड शो – संगम व युक्ती, मॉक स्टॉक – एकता व विश्व, एच.आर. टीम बिल्डिंग– दक्षता व विश्व. बेस्ट मॅनेजर किताब रितू चुग (एमबीए–१) हिला मिळाला. स्पर्धेत मैत्री संघाने सर्वसाधारण विजेतेपद तर युक्ती संघाने उपविजेतेपद पटकावले. विजेत्या व उपविजेत्या संघांना रोख पारितोषिके, चषक व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

या संपूर्ण उपक्रमाचे सुंदर नियोजन एमबीए –२ च्या ऑर्गनायझिंग कमिटीने (एकता) केले. त्यांच्या कल्पकतेने आणि परिश्रमाने कार्यक्रम उत्कृष्टरित्या पार पडला. डॉ. मनोज कुलकर्णी, डॉ. हर्षवर्धन भावसार यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

# शेवगावमध्ये मातंग समाजातील गरजू कुटुंबांच्या घरकुलाचा मार्ग मोकळा!

**नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत महत्त्वपूर्ण ठराव मंजूर; नगराध्यक्षा माया अरुण मुंढे यांच्या अध्यक्षतेखाली निर्णय**



(छाया : बाबा पालवे)

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** शेवगाव येथील महादेव मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेतील पात्र रहिवाशांना शासकीय घरकुल योजनेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ. माया अरुण मुंढे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शेवगाव नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत यासंदर्भातील ठराव मंजूर करण्यात आला.

मौजे शेवगाव येथील गट क्रमांक ११०७/१/अ मधील १ हेक्टर ९७ आर शासकीय जमीन सन १९६३ मध्ये मातंग समाजातील नागरिकांच्या निवासासाठी मंजूर करण्यात आली होती. या जागेवर महादेव मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत असून, सातबारा उताऱ्यावरही संस्थेची नोंद आहे.

या ठिकाणी मातंग समाजातील अनेक गरीब, गरजू व भूमिहीन कुटुंबे अनेक वर्षांपासून वास्तव्यास आहेत. आर्थिक परिस्थितीमुळे अनेक कुटुंबांना आजही कच्च्या व तात्पुरत्या घरांमध्ये राहावे लागत आहे. या कुटुंबांना पक्की घरे उपलब्ध व्हावीत, यासाठी घरकुल योजनेचा लाभ मिळण्याची मागणी करण्यात येत होती. या पार्श्वभूमीवर संस्थेतील रहिवाशांची प्रत्यक्ष पाहणी आणि सातबारा उताऱ्यावरील नोंदींचा विचार करून, पात्र लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना किंवा इतर लागू शासकीय घरकुल योजनेंतर्गत लाभ मिळवून देण्याबाबत नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर करण्यात आला.

या ठरावामुळे अनेक वर्षांपासून घरकुलाच्या प्रतीक्षेत असलेल्या गरजू कुटुंबांच्या मागणीला प्रशासकीय स्तरावर चालना मिळाली आहे. पुढील शासकीय प्रक्रिया पूर्ण होऊन पात्र लाभार्थ्यांना पक्क्या घरांचा लाभ मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. गरजू कुटुंबांना हक्काचा निवारा मिळावा आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा व्हावी, या दृष्टीने नगरपरिषदेने घेतलेल्या या निर्णयाचे महत्त्व अधोरेखित होत आहे.

# जागतिक हात धुवा दिनानिमित्त जिल्ह्यात विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्याचे आवाहन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जागतिक हात धुवा दिनानिमित्त १५ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, शाळा व अंगणवाड्यांमध्ये विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्याचे आवाहन जिल्हा परिषद अहिल्यानगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले आहे.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस जागतिक हात धुवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून वैयक्तिक स्वच्छता, हात धुण्याचे महत्त्व आणि स्वच्छतेच्या सवयींबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.




या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना हात धुण्याची योग्य पद्धत, हात धुण्याचे फायदे आणि स्वच्छतेचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांकडून हात धुण्याचे प्रात्यक्षिक करून घेणे, ग्रामस्तरावर जनजागृती करणे, समुदाय बैठका आयोजित करणे आणि शाळांमध्ये जनजागृती रॅली काढणे यांसारखे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

या कार्यक्रमांचे नियोजन गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी आणि बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी आपापल्या स्तरावर करावे. राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा सचित्र अहवाल १९ ऑक्टोबर २०२६ पर्यंत जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या संबंधित कार्यालयास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

स्वच्छतेच्या चांगल्या सवयी अंगीकारून निरोगी समाजाच्या निर्मितीसाठी जागतिक हात धुवा दिनानिमित्त जिल्ह्यात व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन राजेंद्र देसले प्रकल्प संचालक जलजीवन यांनी केले आहे.

# ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी मोर्चाला पोलिसांचा नकार!

**पैठण पोलिसांचे आयोजकांना लेखी पत्र; कायदा–सुव्यवस्थेचे कारण पुढे**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी पैठण येथे आज म्हणजे १३ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या निषेध मोर्चा व आंदोलनाला पैठण पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. यासंदर्भात पैठण पोलीस ठाण्याकडून आयोजकांना लेखी पत्र देण्यात आले असून, पोलिसांच्या या निर्णयामुळे आंदोलनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या पत्रानुसार, पैठण शहरात सार्वजनिक देवी मंडळांची स्थापना करण्यात आली असून, विविध धार्मिक कार्यक्रमांच्या निमित्ताने नागरिकांची गर्दी होत असते. सध्याची परिस्थिती लक्षात घेता मोर्चा व आंदोलनामुळे कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. तसेच, सार्वजनिक देवी मंडळांच्या ठिकाणी गर्दी होत असल्याने अनुचित प्रकार घडण्याची शक्यताही पत्रात व्यक्त करण्यात आली आहे. या कारणांचा आधार घेत पोलिसांनी प्रस्तावित मोर्चा व आंदोलनाला परवानगी नाकारली आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी घेऊन आंदोलन करण्याची तयारी करणाऱ्या आयोजकांची या निर्णयानंतर पुढील भूमिका काय असेल, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी उद्योजकीय मानसिकता विकसित करावी– दर्शन मेहेर

**एसपीपीयू स्टार्टअप टॉक सिरीज अंतर्गत २०० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'एसपीपीयू स्टार्टअप टॉक सिरीज' उपक्रमांतर्गत 'कल्पनेपासून परिणामापर्यंत : अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये उद्योजकीय मानसिकतेची जडणघडण' या विषयावर विशेष व्याख्यान संपन्न झाले. या व्याख्यानात ऑडियाबेंटिक बॅटरीज प्रायव्हेट लिमिटेडचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी दर्शन मेहेर यांनी विद्यार्थ्यांना उद्योजकता, स्टार्टअपची उभारणी आणि निधी संकलन याविषयी मार्गदर्शन केले.

७ ऑक्टोबर रोजी महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमात मेहेर यांनी स्वतःच्या उद्योजकीय प्रवासातील अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले. एखाद्या नावीन्यपूर्ण कल्पनेचे यशस्वी व्यवसायात रूपांतर करताना येणारी आव्हाने, त्यावर मात करण्याचे मार्ग आणि व्यवसायाच्या वाढीसाठी आवश्यक असणारे नियोजन याविषयी त्यांनी माहिती दिली. स्टार्टअप उभारण्यासाठी केवळ कल्पना असून चालत नाही, तर तिची व्यवहार्यता तपासणे, योग्य व्यवसाय योजना तयार करणे आणि उपलब्ध संधींचा प्रभावीपणे उपयोग करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच गुंतवणूकदारांपर्यंत पोहोचणे, त्यांच्यासमोर व्यवसायाची संकल्पना प्रभावीपणे मांडणे आणि त्यांचा विश्वास संपादन करून निधी उभारणे या प्रक्रियेतील महत्त्वाचे पैलू त्यांनी उलगडून सांगितले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. नवथर, विविध विभागांचे विभागप्रमुख आणि प्राध्यापक उपस्थित होते. महाविद्यालयाच्या नऊ अभियांत्रिकी शाखांमधील सुमारे २०० विद्यार्थी आणि १० प्राध्यापकांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला. प्राचार्य डॉ. नवथर यांनी प्रास्ताविकात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांमध्ये नावीन्यपूर्ण विचार, उद्योजकीय दृष्टिकोन आणि स्टार्टअप संस्कृती विकसित करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

(पान १ वरून)

# दुष्काळग्रस्त भागातील पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचा सुरळीत पुरवठा

दि. ८ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात येत असून, पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या नियमांनुसार लाभ मिळावा यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय राखण्यात येत आहे. अन्नधान्य वितरणात अडचणी निर्माण झाल्यास त्या तातडीने संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देऊन आवश्यक कार्यवाही करण्यावर भर आहे.

नवीन लाभार्थ्यांची निवड शासनाच्या निकषांनुसार

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ अधिकाधिक पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी नवीन लाभार्थ्यांची निवड शासनाने निर्धारित केलेल्या निकषांनुसार केली जाते. प्राप्त माहितीनुसार, नवीन लाभार्थ्यांच्या निवडीसाठी शहरी भागात वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ५९ हजार रुपये, तर ग्रामीण भागात ४४ हजार रुपये विचारात घेतले जातात.

लाभार्थ्यांची पात्रता निश्चित करताना संबंधित शासन निर्णय, लागू नियम आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून पुढील कार्यवाही केली जाते. त्यामुळे पात्र नागरिकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ मिळविण्यासाठी संबंधित नियमांनुसार अर्ज व कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

'वन नेशन, वन रेशन कार्ड'मुळे स्थलांतरित लाभार्थ्यांनाही सुविधा

केंद्र शासनाच्या 'वन नेशन, वन रेशन कार्ड' योजनेअंतर्गत पात्र शिधापत्रिकाधारकांना पोर्टेबिलिटीची सुविधा उपलब्ध आहे. रोजगार, व्यवसाय किंवा अन्य कारणांमुळे एखादा लाभार्थी दुसऱ्या तालुक्यात, जिल्ह्यात अथवा राज्यात स्थलांतरित झाला, तरी योजनेच्या लागू नियमांनुसार आणि उपलब्ध पात्रतेनुसार संलग्न रास्तभाव दुकानातून अन्नधान्याचा लाभ घेता येतो.

या सुविधेमुळे स्थलांतरित कामगार आणि इतर पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य मिळविण्यासाठी केवळ मूळ गावातील रास्तभाव दुकानावर अवलंबून राहावे लागत नाही. त्यामुळे स्थलांतरित ठिकाणीही सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ घेणे सुलभ होते.

अन्नधान्य वितरणाबाबत तक्रारी असल्यास संपर्क साधण्याचे आवाहन

पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य मिळण्यात अडचण येत असल्यास किंवा वितरणाबाबत तक्रार असल्यास त्यांनी संबंधित रास्तभाव दुकानदार, तहसील कार्यालयातील पुरवठा विभाग किंवा जिल्हा पुरवठा कार्यालयाशी संपर्क साधावा. तक्रारींची दखल घेऊन नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्याची व्यवस्था उपलब्ध आहे.

दुष्काळाच्या परिस्थितीत नागरिकांना अन्नधान्याचा नियमित लाभ मिळणे, उपलब्ध साठ्याचे योग्य नियोजन करणे आणि वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखणे याला प्राधान्य देण्यात येत आहे. पुरवठा यंत्रणेने समन्वयाने काम करून पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे अन्नधान्य वेळेत उपलब्ध करून द्यावे, यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे.

# अहिल्यानगरच्या रेल्वे प्रश्नांसाठी खासदार नीलेश लंके आक्रमक

अहिल्यानगर रेल्वे स्थानकावर अमृत भारत योजनेंतर्गत झालेल्या कामांच्या दर्जाची चौकशी करावी, असे मुद्देही त्यांनी मांडले. अहिल्यानगर एमआयडीसीतील स्थानिक लघुउद्योजकांना रेल्वेच्या पुरवठा साखळीत संधी मिळावी, यासाठीही पाठपुरावा करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

निंबळक येथील रेल्वे गेट क्रमांक ३०, विळद, वांबोरी, अरणगाव आणि श्रीगोंदा साखर कारखाना परिसरातील रेल्वे उड्डाणपूल व भुयारी मार्गांची कामे मार्गी लावण्याची मागणी खासदार लंके यांनी केली. या प्रकल्पांची सद्यस्थिती स्पष्ट करून काम सुरू होण्याची आणि पूर्ण होण्याची तारीख निश्चित करावी, अशी भूमिका त्यांनी मांडली.

पुणे–अहिल्यानगरदरम्यान डेमू किंवा ईएमयू लोकल सेवा सुरू करण्यासाठी ठोस कृती आराखडा तयार करावा, तसेच अहिल्यानगरहून जयपूर आणि खाटू श्यामसाठी रेल्वे सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली. पुणे–लखनऊ, पुणे–गोरखपूर, यशवंतपूर–चंदीगड आणि संपर्क क्रांती यांसारख्या गाड्यांना अहिल्यानगर स्थानकावर थांबा देण्याचा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. बेलवंडी व विसापूर स्थानकांवर महत्त्वाच्या गाड्यांना थांबे देण्यासह कोरोना काळात बंद झालेल्या नांदेड–दौंड, मनमाड–पुणे आणि शिर्डी–मुंबई पॅसेंजर सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी त्यांनी केली. अहिल्यानगर रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक दोन व तीनसाठी केडगाव बाजूने स्वतंत्र स्टेशन इमारत आणि प्रवेशद्वार उभारावे, अशी मागणीही खासदार लंके यांनी केली. स्थानकावर लिफ्ट, एस्कलेटर, महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र प्रतीक्षागृहे उपलब्ध करून देण्यासह ड्रेनेजची समस्या, दुर्गंधी, मोकाट कुत्रे आणि रणगाडा परिसरातील अस्वच्छता दूर करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, असे त्यांनी नमूद केले. आरक्षण व चौकशी खिडकीच्या वेळा पूर्ववत सकाळी आठ ते रात्री आठपर्यंत करण्याची मागणीही करण्यात आली.

अहिल्यानगर जिल्ह्यातील रेल्वे संपर्काचा विस्तार, प्रवाशांची सुरक्षितता, शेतमाल वाहतूक आणि स्थानिक रोजगार या बाबींना प्राधान्य देऊन रेल्वे प्रशासनाने ठोस कार्यवाही करावी, यासाठी संसदीय समितीच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे खासदार नीलेश लंके यांनी स्पष्ट केले.

# माजी पंचायत समिती सदस्य नंदकिशोर वाघमारे यांचा मनसेत प्रवेश

नंदकिशोर वाघमारे म्हणाले की, जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी आज शहराध्यक्ष पदाची जबाबदारी देऊन जो विश्वास माझ्यावर दाखवला आहे तो मी नक्कीच सार्थ ठरविन व राजसाहेब ठाकरे यांना अभिप्रेत असलेले काम शहरात करून दाखवीन तालुकाध्यक्ष मंगेश पाखरे व मी शहरामध्ये चांगले संघटन उभे करू

यावेळी तालुकाध्यक्ष मंगेश पाखरे, पाथर्डी तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ, गोरख वाघमारे, किसन कर्डिले, भारत इथापे, अशोक डमाळ, शायद शेख, अंबादास काळे, गणेश गांगे, सचिन गुजर, डोईफोडे मिस्तरी, गणेश बाबर यांसह शहरातील मनसैनिक उपस्थित होते